**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2020, VOL- 7/59*

# संबंधित साहित्य व संशोधन आढावा : एक दृष्टिक्षेप

**पी. बी. वाघेरे, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक , म.वि.प्र समाजाचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयं, नाशिक*
*parashramwaghere@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

कोणतेही संशोधन कार्य करताना आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. आढावा घेतल्यामुळे संशोधक जे संशोधन कार्य करत आहे; त्याआधी त्याच विषयावर किंवा संबंधित विषयासंदर्भात कोणी कार्य केले आहे का? या बाबी निदर्शनास येतात. यामुळे संशोधन कार्याची पुंनरावृत्ती होणे प्रामुख्याने टाळता येते. संशोधकाचा वेळ,पैसा व श्रम याची बचत होते. तसेच आधाव्यामुळे जे संशोधन कार्य संशोधक करत आहे; त्या कार्याला दिशा प्राप्त होते. संशोधन व साहित्य आधाव्यामुळे समस्येच्या शोधात समर्पकता व नेमकेपणा येतो.

संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्वपूर्ण साहित्य उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञांनाचा आधार घेऊन त्यापुढील ज्ञांनाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञांनाच्या नवीन परिस्थितीमधील बदललेला अर्थ विषाद करण्यासाठी संबंधित साहित्याचे परिशीलन आवश्यक

संशोधन कार्य कोणतेही असो,कोणत्याही विद्याशाखेचे पी.जी.संशोधन कार्य, एम.फील., पी.एच.डी., minor किंवा major Research Project, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम (DSM), (M.A.Education.),एम.ए. विषय संप्रेषण सर्व संशोधन कार्यासाठी संबंधित साहित्य व संशोधन आढावा घेणे गरजेचे आहे.

संबंधित साहित्य व संशोधन आढावा लिहिण्याआधी आढाव्याची गरज संशोधकाने नमूद करावी. यातून ठळकपणे आढाव्याची गरज स्पष्ट करणे अभिप्रेत आहे. तदनंतर, संबंधित साहित्य व संशोधन आढाव्याची उद्दिष्ट्ये स्पष्ट करावी. संबंधित साहित्य व संशोधन आढाव्याचे महत्व नमूद करावे.

संबंधित आढाव्याचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात .

1 साहित्याचा आढावा

2 संशोधांनाचा आढावा

अ) साहित्य आधाव्या अंतर्गत पुढील स्रोतांचा समावेश होतो.

1 मासिक

2 गोषवारा

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3 शब्दकोश

4 ज्ञानकोश

5 संदर्भ पुस्तके

6 सर्वेक्षण अहवाल

7 हस्तपुस्तिका

8 नियतकालिके

9 इंटरनेटचा उपयोग

10 ई- पुस्तके

या स्रोतंद्वारे संशोधक आपल्या संशोधन कार्याच्या संदर्भात संबंधित साहित्याचा आढावा (Review of Related Literature ) घेऊ शकतात. संशोधकाने जाणीवपूर्वक जे जे साहित्याचे आधावे घेतले, ते ते साहित्य आढावे स्रोत संशोधन अहवालामध्ये नमूद करणे गरजेचे आहे.

ब ) संशोधन आढाव्याअंतर्गत पुढील स्रोतांचा समावेश होतो.

1 पी.एच.डी. प्रबंध

2 एम.फील. प्रबंध

3 एम.एड./ पी.जी. लघुशोध प्रबंध

4 कृतिसंशोधने

5 Minor / Major Research Projects

6 संशोधन संस्थांचे अहवाल

संशोधकांनी कोणत्या पदवी साठी कोणत्या विद्यापीठातून, कोणत्या वर्षी संशोधन कार्य केले आहे. हे नोंदवणे गरजेचे आहे.

संशोधकांनी आपल्या विषयाच्या संदर्भात आढावा घेत असलेल्या संशोधन कार्याची उद्दिष्ट्ये, नमूना निवड पद्धत्ती व नमूना, संशोधन पद्धत्ती व निष्कर्ष नोंदविणे आवश्यक आहे. तसेच संशोधकाचे व मार्गदर्शकाचे नाव नोंदवावे. संशोधन आढावा घेत असलेल्या संशोधांनाची अनेक उद्दिष्टय व उद्दिष्ट्य निहाय निष्कर्ष असले तरी प्रस्तुत संशोधन कार्याच्या संदर्भात जे उद्दिष्ट्य आहे, तेच नमूद करून त्याच उद्दिष्ट्याचे निष्कर्ष नोंदवावेत.

संशोधक अनेक स्रोतांच्या माध्यमातून online आढावे घेऊ शकतात.

टेलिफोन

मोबाइल

मेल

व्हाट्स ॲप

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

टेलिग्राम

इनस्टाग्राम

Message

समजा, संशोधक ज्या विषयावर कार्य करत आहे, त्या विषयाचे तज्ञ हे video call द्वारे मुलाखत देऊ शकतात. फोनद्वारे मार्गदर्शन करू शकतात. अशा प्रकारे माहिती गोला केल्यास ते संदर्भ ऑनलाइन म्हणून ओळखले जातात. ताशा प्रकारची नोंद संशोधकाने करावी.

साहित्य व संशोधन आढावे किती घ्यावे? याबाबत संशोधकाच्या मनात प्रश्न असतो. यासंदर्भात संख्येची मर्यादा नाही. सबंधित साहित्य व संशोधन आधाव्याला न्याय मिळेल; एवढे आढावे घ्यावेत. संशोधन विषयावर, ही बाब अवलंबून आहे एखाद्या विषयासंदर्भात साहित्य आढावे जास्त मिळतील तर संशोधन आढावे कमी मिळतील किंवा एखाद्या विषयासंदर्भात संशोधन आढावे जास्त मिळतील व साहित्य आढावे कमी मिळतील. हरकत नाही, याबाबी त्या त्या संशोधन विषयाच्या स्वरूपावर अवलंबून असतात.

संशोधकांनी साहित्य व संशोधन आढावे घेतल्यानंतर त्या त्या संशोधन आढाव्याचे उपयोग नमूद करणे गरजेचे आहे. तसेच,साहित्य व संशोधन आढावे घेतल्यानंतर प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण नमूद करणे आवश्यक आहे.

साहित्य व संशोधन आढावे हे एकतर चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडणे आवश्यक आहे. तसेच, website वरुन जी माहिती घेतली ती website व दिनांक नमूद करावे.

थोडक्यात संबंधित साहित्य व संशोधन आढाव्यामुळे संशोधकास त्याच्या संशोधन कार्याच्या संदर्भात दिशा प्राप्त होते.संशोधका आधी ज्यांनी संशोधन कार्य केले आहे ,त्यांनी संशोधांनाची कोणती कार्यपद्धती वापरली आहे ,याचा अंदाज येतो .त्यानुसार संशोधक त्याच्या संशोधन कार्याची उद्दिष्टांनुसार संशोधन कार्यपद्धती तयार करतो. आढाव्यांमुळे पुंनरावृत्ती न होता नवीन संशोधन कार्य संशोधन जगतात येते, नवीन संशोधांनाची भर पडते, मात्र एकच अपेक्षा ते संशोधन कार्य समजाभिमुख व समाजपयोगी असावे.

**संदर्भ** -

*भिंताडे,वि.रा. शैक्षणिक संशोधन पद्धत्ती , नूतन प्रकाशन ,पुणे*

*मुळे, संदीप शैक्षणिक संशोधनाची ओळख, ईनसाईट पब्लिकेशन, नासिक*

*मुळे, रा. शं व उमाठे वि.तू., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र राज्य निर्मिती मंडल, नागपुर*

*Kothari, C.R., Research Methodology,*

*New Age International Publishers, New Delhi*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*